(ESTD. 1965)
Gondia Education Society's
SETH NARSINGDAS MOR COLLEGE OF ARTS & COMMERCE &
SMT. G. D. SARAF SCIENCE COLLEGE
Tumsar-441912 (M.S.) Dist. Bhandara
Ph. No. Office : (07183) 233300 Res. : (07183) 233301
Email - principalsnmorcollege@rediffmail.com, snmorcollege1965@gmail.com website : snmorcollege.org.in

Ref. No. : SNMC/2022-23 Date : 21.09.2022

# खाद्य पदार्थ महोत्सव व प्रदर्शन कार्यक्रम

गोंदिया शिक्षण संस्था द्वारा संचालित सेठ नरसिंगदास मोर कला, वाणिज्य व श्रीमती जी. डी. सराफ विज्ञान महाविद्यालयात दिनांक १६/०९/२०२२ रोजी खाद्य पदार्थ, हस्तनिर्मित कलात्मक वस्तु महोत्सव व प्रदर्शनीचा कार्यक्रम संपन्न झाला. एस. एन. मोर महाविद्यालय व तुमसरातील श्रीमती जी. बी. महिला महाविद्यालयातील गृह अर्थशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उदघाटन प्रसंगी एस. एन. मोर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चेतनकुमार मसराम म्हणाले की 'गृह अर्थशास्त्र हा विषय मानवी जीवनातील अत्यंत महत्वाचा आहे. स्वयंपाक, बालसंगोपन, घरकामाचे व्यवस्थापन या बाबी प्रत्येकाच्या जीवनात मोलाच्या असतात या जबाबदा-या फक्त स्त्रियांच्याच नसुन पुरुषांनीही या कामामध्ये सक्रिय सहभाग नोंदवावा आजच्या या महोत्सवातून सर्वांनीच ही प्रेरणा घ्यावी. विद्यार्थ्यांमधील कलागूणांना व निर्मितीशिलतेला वाव मिळावा या हेतूने सदरील कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या खाद्य पदार्थ, हस्त निर्मित वस्तू, विविध कला, क्रीड़ा अशा विविध समावेश असलेले एकूण स्टॉल ३० आले होते. या वस्तुंच्या प्रदर्शनासोबतच त्याची विक्री सुद्धा येथे करण्यात आली. विद्यार्थ्यांनी उद्यमशील व्हावे तसेच स्वत: रोजगार निर्माण करुन स्वावलंबी व्हावे या दृष्टीने 'कमवा आणि शिका' या योजनेचा येथे सराव करण्यात आला. त्यामुळे सदरील कार्यक्रम महत्वाचा ठरला. या कार्यक्रमाच्या उद्घाटन सत्राचे अध्यक्ष एस. एन. मोर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चेतनकुमार मसराम हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयातील गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. भारती काटेखाये यांनी केले. सूत्रसंचालन जी. बी. भुरे महाविद्यालयातील गृह अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. कल्पना राउत यांनी केले. तर स्वतः डॉ. सुनीता राठोड यांनी आभार प्रदर्शन केले. एस. एन. मोर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी लक्ष्मण पेटकुले तसेच श्रीमती जी. बी. महिला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. मुबारक कुरैसी यांना कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदवीला. या कार्यक्रमातील स्पर्धेमधे प्रथम क्रमांक प्रिया बनकर, द्वितीय क्रमांक सोनम सोनटके तर तृतीय क्रमांक वैष्णवी चौधरी व तीच्या चमू ने पटकावला. या कार्यक्रमात डॉ. राहुल भगत, डॉ. जयंतकुमार मस्के, प्रा. अमोल खांदवे, प्रा. रेणुकादास उबाळे, डॉ. आर. के. दिप्टे, जी. जी. बघमार, राजेश दीपटे, डॉ. एम. एफ. जाधव, डॉ. के. एन. साठवणे, डॉ. संजय आगाशे,

प्रा. आरती साळवे, के. के. लेंडे, आर. ओ. बेलोकार आदि प्राध्यापक उपस्थित होते. तसेच महिला महाविद्यालयातील नीता गभणे, अरुणा थुल, प्रा. विकास मेश्राम, प्रा मंगेश वागदे आदि प्राध्यापक उपस्थित होते. महाविद्यालयातील विद्यार्थांनी या कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.













